# प्रसिध्दी पत्रक

**श्रीमती सुनिता किसन चंडोल, वय ३९ वर्षे, पद आरोग्य सेविका, ने. उपकेंद्र बोरगाव, ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद या २५०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्रीमती सुनिता किसन चंडोल, वय ३९ वर्षे, पद आरोग्य सेविका, ने. बोरगाव सारणी, ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद<br>रा. घाटनांद्रा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद. |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १२/१२/२०१८ रोजी पंचायत समिती समोर डिडीओ कार्यालय, सिल्लोड जवळ |
| लाचेची रक्कम | :- | २५०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना आरोग्य विभागात आरोग्य सेवक या पदावर ओळखीचे अधिकारी मार्फत नौकरी लावून देण्याकरिता. |

यातील आरोपी लोकसेविका श्रीमती सुनिता चंडोल ह्या आरोग्य विभागात आरोग्य सेविका या पदावर कार्यरत आहे. त्यांनी आरोग्य विभागातील त्यांचे ओळखीचे अधिकारी यांना सांगून यातील मुळ तक्रारदार यांना आरोग्य विभागात आरोग्य सेवक या पदावर नौकरी लावून देते असे सांगून त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,००,०००/- रुपयाची मागणी करून, ४,७०,०००/- यापुर्वीच घेतले होते. आता पुन्हा तक्रारदार यांना मेगा भरती मध्ये आरोग्य विभागातील अधिकारी यांचेमार्फत आरोग्य सेवक पदावर नौकरी लावून देण्यासाठी आणखी २५,०००/- रुपयाची मागणी आरोग्यसेविका श्रीमती चंडोल यांनी तक्रारदार यांच्याकडे केली. परंतू तक्रारदार यांची श्रीमती सुनिता चंडोल यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ११/१२/२०१८ रोजी श्रीमती सुनिता किसन चंडोल, वय ३९ वर्षे, पद आरोग्य सेविका यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांना पाठवून लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता, श्रीमती चंडोल यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांना आरोग्य विभागात आरोग्य सेवक या पदावर आलोसे यांचे ओळखीचे आरोग्य विभागातील अधिकारी यांचे मार्फत नौकरी लावून देण्याकरिता २५०००/- रु लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दि.१२/१२/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला असता, श्रीमती सुनिता किसन चंडोल, वय ३९ वर्षे, पद आरोग्य सेविका, ने.उपकेंद्र बोरगाव, ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष २५,०००/- रुपये लाचेची रक्कम पंचायत समिती समोर डिडीओ कार्यालय, सिल्लोड जवळ तक्रारदार यांचेकडून स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

नितीन देशमुख
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद